# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः17.03.2025** **वारःसोमवार**

---

1. भारताच्या शांतता संवादाला जगाचा नेहमीच प्रतिसाद मिळतो-पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. न्युझीलंडचे पंतप्रधान ख्रिस्तोफर लक्सन भारत दौऱ्यावर -रायसीना डायलॉगच्या दहाव्या आवृत्तीचं करणार उद्घाटन
3. बोडोलँडच्या विकासासाठी केंद्र सरकार कटिबध्द -केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची ग्वाही
4. सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर उद्या पृथ्वीवर परतणार-नासाची माहिती आणि
5. देशाच्या काही भागात पारा चढता राहणार, ओडिशात उष्णतेच्या तीव्र लाटेचा इशारा

**<u>पंतप्रधान पॉडकास्ट</u>**

भारताच्या शांतता संवादाला जगाचा नेहमीच प्रतिसाद मिळतो, जगभरांत भारताचं म्हणणं ऐकून घेतलं जातं कारण भारत ही बुद्धांची आणि गांधीजींची भूमी आहे. असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल एका पॉडकास्टमध्ये केलं. 140 कोटी भारतीय आपलं सामर्थ्य असल्याचं ते म्हणाले. कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधक आणि पॉडकास्टर लेक्स फ्रीडमन यांच्याशी पंतप्रधानांनी साधलेल्या संवादाचं प्रक्षेपण काल संध्याकाळी फ्रीडमन यांच्या पॉडकास्टद्वारे करण्यात आलं. यामध्ये बोलताना पंतप्रधानांनी आपलं बालपण, मुख्यमंत्रीपद तसंच पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीपासून जागतिक पटलावरच्या महत्त्वाच्या विविध विषयांवर भाष्य केलं. ते म्हणाले...

***मैं उस देश का प्रतिनिधित्व कर रहा हूँ, जो महात्मा गांधी की भूमि है। और ये ऐसे महापुरूष हैं कि जिनके उपदेश, जिनकी वाणी, वर्तन, व्यवहार पूरी तरह शांति को समर्पित है और इसलिए सांस्कृतिक रूप से, ऐतिहासिक रूप से, हमारा बैकग्राउंड इतना मजबूत है कि जब भी हम शांति के लिए बात करते हैं, तो विश्व हमें सुनता है। और हम संघर्ष के पक्ष के है ही नहीं, हम समन्वय के पक्ष में हैं। न हम प्रकृति से संघर्ष चाहते हैं, न हम राष्ट्रों के बीच में संघर्ष चाहते हैं, हम समन्वय चाहने वाले लोग हैं। और उसमें अगर कोई भूमिका हम अदा कर सकते हैं, तो हमने निरंतर अदा करने का प्रयत्न किया है।***

भारत तटस्थ राहात नाही; तर आम्ही शांततेसाठी वचनबद्ध असल्याचं पंतप्रधानांनी ठामपणे नमूद केलं. राष्ट्राराष्ट्रांमधल्या संघर्षांबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले की, मतभेदांवर नव्हे तर संवादावर लक्ष केंद्रित केलं तरच स्थिर आणि सहकार्यात्मक संबंध निर्माण होऊ शकतात.

**<u>न्युझीलंडचे पंतप्रधान</u>**

न्युझीलंडचे पंतप्रधान ख्रिस्तोफर लक्सन भारताच्या दौऱ्यावर असून, आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह ते रायसीना डायलॉगच्या दहाव्या आवृत्तीचं नवी दिल्लीत उद्घाटन करतील. 'कालचक्र -नागरिक, शांतता आणि वसुंधरा' अशी या तीन दिवसांच्या रायसीना डायलॉगची मध्यवर्ती संकल्पना आहे. या कार्यक्रमादरम्यान, जगभरातील तज्ञ आणि विचारवंत सहा विविध विषयांवर संवाद साधतील. रायसिना डायलॉगमध्ये सहभागी होण्यासाठी अनेक परदेशी मान्यवर दिल्लीत दाखल झाले आहेत. यामध्ये क्युबा आणि लक्झेंबर्गचे उपपंतप्रधान, घाना, स्लोव्हेनिया आणि पेरूचे परराष्ट्र मंत्री आणि मालदीवचे माजी अध्यक्ष मोहम्मद नशीद यांचा समावेश आहे.

दरम्यान, न्युझीलंडचे पंतप्रधान ख्रिस्तोफर लक्सन यांचं पाच दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी काल नवी दिल्लीत आगमन झालं. न्युझीलंड सरकारचे मंत्री, वरिष्ठ अधिकारी, व्यावसायिक, माध्यमांचे प्रतिनिधी तसंच भारतीय प्रतिनिधी मंडळाचे सदस्य त्यांच्या समवेत

दौऱ्यावर आले आहेत, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयानं दिली. दोन्ही देशांदरम्यान द्विपक्षीय मुद्यावर चर्चा करण्यासाठी लक्सन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत. तसंच राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही ते भेट घेतील.

भारत आणि न्यूझीलंडनं व्यापक आणि परस्पर हितासाठी मुक्त व्यापार कराराकरता वाटाघाटी सुरू करण्याची घोषणा काल करण्यात आली. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल आणि न्यूझीलंडचे व्यापार आणि गुंतवणूक मंत्री टॉड मॅकक्ले यांच्यात नवी दिल्लीत झालेल्या बैठकीनंतर ही घोषणा करण्यात आली. भारत आणि न्युझीलंडदरम्यानचा द्विपक्षीय व्यापार सातत्यानं वाढत आहे. एप्रिल 2024 ते जानेवारी 2025 या कालावधीत तो एक अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त झाला आहे. अशी माहिती गोयल यांनी दिली.

**<u>अमित शहा</u>**

आसाममधील बोडोलँडचा विकास करण्यासाठी केंद्र सरकार कटिबध्द असल्याचा पुनरुच्चार केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी काल केला. हा विकास शांततामय मार्गाने संधी केला जाईल असं ते म्हणाले. कोक्राझार जिल्ह्यातील डोटमा इथं आयोजित ऑल बोडो स्टुडंस युनियनच्या 57 व्या वार्षिक परिषदेला प्रमुख पाहुणे म्हणून संबोधित करताना ते बोलत होते. आतापर्यंत बोडो करारातील 82 टक्के कलमं अंमलात आणली आहेत, उर्वरित कलमं पुढील दोन वर्षांत पूर्ण केली जातील. अशी ग्वाही त्यांनी यावेळी बोलताना दिली. त्यानंतर ईशान्या भारतातील सर्व मुख्यमंत्री आणि मणिपूरच्या राज्यपाल यांच्याबरोबर तीनही फौजदारी कायद्याच्या अंमलबजावणीबाबत त्यांनी आढावा बैठक घेतली.

**<u>सीतारमन</u>**

अर्थमंत्री निर्मला सीतारमण आज पंतप्रधान इंटर्नशिप अर्थात आंतरवासीता योजनेसाठी (पीएमआयएस) एक समर्पित ॲपचं उद्घटन करणार आहेत. यामुळे इंटर्नशीप योजनेच्या दुसऱ्या फेरीसाठी नोंदणी सुलभ करून विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे, येत्या 31 मार्चपर्यंत अर्ज स्वीकारले जातात.

**<u>नासा</u>**

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात नऊ महिन्यांहून अधिक काळ अडकलेले सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर हे दोन अंतराळवीर उद्या रात्री पृथ्वीवर परततील अशी माहिती नासाने एका निवेदनाद्वारे दिली आहे. सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर, यांना आणखी एक अमेरिकन अंतराळवीर आणि एका रशियन अंतराळवीरासह स्पेसएक्स क्रू ड्रॅगन यानाद्वारे भुतलावर आणण्यात येईल. अमेरिकन अवकाश संस्था नासाचे अंतराळवीर निक हेग आणि रोसकॉसमॉस अंतराळवीर अलेक्झांडर गोर्बुनोव्ह देखील ड्रॅगन कॅप्सूलवर परततील. आठ दिवसाच्या अभियानासाठी गेलेल्या सुनिता विल्यम्स आणि बुच विल्मोर गेल्या 9 महिन्यांपासून अंतराळांत अडकून पडले आहेत.

**<u>बीएलए</u>**

पाकिस्तानातील बलुचिस्तान प्रांतात काल झालेल्या हल्ल्यात 90 पाकिस्तानी सैनिक मारले गेल्याचा दावा बलुचिस्तान लिबरेशन आर्मी नं केला आहे. नोशकी भागात महामार्ग क्रमांक 40वरुन फ्रंटिअर कॉंस्टबुलरी गटाचे सुरक्षा कर्मचारी बसनं प्रवास करत असताना हा हल्ला झाला. बलुचिस्तान मुक्ती सेनेनं या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे.

**<u>अजित डोवाल</u>**

भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी अमेरिकेच्या गुप्तचर विभागाच्या संचालक तुलसी गबार्ड यांची काल नवी दिल्लीत भेट घेतली. भारत आणि अमेरिकेदरम्यानच्या विविध मुद्यांवर यावेळी चर्चा झाल्याचं वृत्त आहे. तुलसी गिबार्ड विविध देशांच्या दौऱ्यादरम्यान भारत भेटीवर आल्या आहेत.

**<u>मॅसेडोनिया</u>**

उत्तर मॅसेडोनियामध्ये, कोकानी शहरातील एका नाईटक्लबमध्ये काल लागलेल्या आगीत किमान 59 जणांचा मृत्यू झाला आणि 155 हून अधिक जण जखमी झाल्याचं वृत्त आहे. युरोपियन देशातील लोकप्रिय हिप-हॉप बॅंड डीएनकेच्या संगीत कार्यक्रमात सुमारे दिड

हजार नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान वापरांत आलेल्या फटाक्यांमुळे आग लागली असल्याचा प्राथमिक अंदाज असल्याचं गृहमंत्री पेन्स टोस्कोवस्की यांनी माध्यामांशी बोलताना सांगितलं.

**इस्राईल**

येमेन मधील हुथी बंडखोरांकडून, प्रत्युत्तरादाखल होणाऱ्या संभाव्य हल्ल्यांची शक्यता लक्षात घेऊन इस्राईल हवाई दलाने अतिदक्षतेचा इशारा जारी केला आहे. त्यातच, या भागात अमेरिकेने केलेल्या हवाई हल्ल्यांमुळे या प्रदेशातील तणाव अधिकच वाढला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी येमेनमधील हुथी बंडखोरांच्या ठिकाणांवर केलेल्या हवाई हल्ल्यांना 'निर्णायक आणि जोरदार' असं म्हंटल्यानंतर परिस्थिति अधिकच तणावपूर्ण बनली आहे. अमेरिकेने केलेल्या हवाई हल्ल्यात किमान 31 जण मृत्युमुखी पडले तर, शंभराहून अधिक जण जखमी झाल्याचं वृत्त आहे.

**सर्वोच्च न्यायालय कोलकाता-आर. जी. कार प्रकरण**

कोलकाता मधील आर. जी. कार वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात एका कनिष्ठ महिला डॉक्टरवर झालेल्या अत्याचार आणि हत्येच्या प्रकरणाची आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची आजपासून पुन्हा सुनावणी सुरू होणार आहे. मागील सुनावणीत, सरन्यायाधीश खन्ना यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने, या प्रकरणाविरुद्ध देशभरात झालेल्या निदर्शनात सहभागी झालेल्या डॉक्टर्स आणि वैद्यकीय व्यावसायिकांना शिक्षा करू नये असे निर्देश दिले होते.

**तेलंगण**

तेलंगणातील 33 पैकी 22 जिल्ह्यात 40 अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली असून संपूर्ण राज्यात उष्णतेची लाट आहे. झारखंड, बंगाल तेलंगणा, विदर्भ भागात पारा चढता राहणार आहे. ओडिशामध्ये, आज तीव्र उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागानं जारी केला आहे.

झारसुगुडा, संबलपूर आणि कालाहांडी जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी तीव्र उष्णतेच्या लाट असे; सुंदरगड, सोनेपूर, कालाहांडी, बौद्ध आणि बोलांगीर जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेची परिस्थिती असेल असा इशारा हवामान विभागानं जारी केला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार